**तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ व सहायक सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय,यवतमाळ**

**सत्र खटला क्र. २/२०२४**
**निशाणी क्र.२८**

**महाराष्ट्र शासन** तर्फे पो.स्टे. घाटंजी सरकारी अभियोक्ता

**..वि..**

**राजेश रामचंद्र अग्रवाल**

आरोपी.

| | |
|---|---|
| **शासन तर्फे साक्षीदार क्र. २** | |
| मी याद्वारे शपथपूर्वक सांगतो की - | |
| माझे संपूर्ण नाव | सिध्देश्वर हरीष मुंडे |
| वय अंदाजे २५ वर्षे | धंदा- शिक्षण |
| राहणार | प्रोफेसर कॉलणी, घाटंजी, ता. घाटंजी. जि. यवतमाळ. |
| **सरतपासणी श्री. ए.ए. मोहोड सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत शपथेवर सुरुः-** | |

घाटंजी पोलीसांनी मला दिनांक १८/०७/२०२३ रोजी पोलीस स्टेशनला पंच म्हणून हजर राहाण्यासाठी बोलाविले होते. त्यानंतर मी व दुसरा पंच राज पांडे असे दोघे मिळून आरोपीच्या ''दादाजी सुगंध सेंटर'' येथे गेलो. त्यावेळी आमच्या दोघांसोबत ठाणेदार श्री. सुरळकर व पोलीस कर्मचारी श्री. जाधव हे होते. "दादाजी सुगंध सेंटर" हे राजेश अग्रवाल यांच्या मालकीचे होते व ते "दादाजी सुगंध सेंटर" हे दुर्गामाता वार्ड येथील बिल्डींग कॉम्पलेक्स मधील दुकान होते. "दादाजी सुगंध सेंटर" येथे गेल्यावर तेथून सुगंधीत तंबाखूचे पॅकेट, राजनिवास पान मसाला व इतर चार पाच प्रकारचा पान मसाला तसेच जर्दा तंबाखू जप्त करण्यात आला. "दादाजी सुगंध सेंटर" च्या चतुःसिमा मला आता आठवत नाही. "दादाजी सुगंध सेंटर" येथे जप्तीची कारवाई करण्यात आली व त्याबाबत मी व राज पांडे, ठाणेदार सुरडकर यांनी सहया केल्या. आता मला घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखवला, त्यावर माझ्या व राज पांडे तसेच ठाणेदार सुरडकर यांच्या सहया असून **तो पंचनामा निशाणी क्रमांक २९ वर आहे** व त्यातील मजकूर बरोबर आहे. आज आरोपी न्यायालयात हजर आहे व ते ''दादाजी सुगंध सेंटर'' चे मालक आहेत.

**सत्र खटला क्र.०२/२०२४**
**शासन वि. राजेश नि.क्र.२८**

**<u>उलट तपासणी आरोपीचे वकील श्री. आर. पी.साबळे यांचे मार्फत सुरु –</u>**

२. घटनास्थळ जप्ती पंचनाम्यामध्ये "दादाजी सुगंध सेंटर" मधून कथित मुददेमाल जप्त झाल्याचे नमूद करण्यात आलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की घटनास्थळ जप्ती पंचनामा मी वाचून पाहिला नाही. हे म्हणणे खरे नाही की घटनास्थळ जप्ती पंचनाम्यावर मी पोलीस स्टेशनमध्ये सही केली. पोलीस स्टेशनमध्ये लिखापडी करण्यात आली नाही.

३. पोलीस स्टेशनमध्ये आम्ही दुपारी १२.३० ते १.३० वाजताच्या दरम्यान गेलो होतो. त्यावेळी आम्ही पोलीस स्टेशनमध्ये १० मिनीटे हजर होतो. हे म्हणणे खरे आहे की पोलीसांनी मला पोलीस स्टेशनमध्ये सांगीतले होते की आपल्याला सुगंधित तंबाखू जप्त करण्यासाठी जायचे आहे. पोलीसांनी मला सूचनापत्र दिले नाही. पोलीस स्टेशनमधून मी नगर परीषद कॉम्पलेक्समध्ये गेलो होतो. त्या कॉम्पलेक्समध्ये अंदाजे पाच ते सात दुकाने होती. हे म्हणणे खरे आहे की ती दुकाने नगर परिषदेच्या मालकीची होती.

४. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगत आहे की मी आरोपीच्या मालकीचा असलेल्या ''दादाजी सुगंध सेंटर'' या दुकानामध्ये गेलो होतो व त्या दुकानामधून सुगंधीत तंबाखूचे पॅकेट, राजनिवास पान मसाला व इतर चार पाच प्रकारचा पान मसाला तसेच जर्दा तंबाखू जप्त करण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की ज्या दुकानात मी गेलो होतो त्याच्या चतुःसिमा मला माहिती नाही. दिनांक ११/०७/२०२३ रोजी मी पोलीस स्टेशनच्याजवळ हजर होतो. हे म्हणणे खरे नाही की मी नेहमी पोलीसांसाठी पंच म्हणून काम करतो व पोलीसांच्या सांगण्यावरुन मी आज खोटी साक्ष देत आहे.

**श्रवणोत्तर स्वीकृत**

दिनांक – ०३/०१/२०२६

(पि.एस. इंगळे)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.